रे.दि.मु.नं. २२९/२०१४ मधील नि. ६२ खालील आदेश
( शोभावती वाघमोडे व इतर वि.शिवाजी भगवान पाटील व इतर )

CNR No.MHSO20-000935-2014

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र. ३ यांचे वारसांतर्फे वादी क्र. ३ यांचेविरुध्द झालेलाअबेटमेंटचा हुकूम रद्द होवून मिळणेसाठी केलेला आहे. वादी क्र. ३ यांचे वारसांचे कथनानुसार, सदरचा दावा चालू असताना वादी क्र. ३ तारामती रामचंद्र भंडारे ही दि. २६/०८/२०२० रोजी मयत झालेली आहे. कोरोना या आजारामुळे न्यायालयीन कामकाज पूर्णपणे चालू नसल्यामुळे व सदर दाव्याची माहिती या वादी क्र. ३ चे वारसांना माहिती नसल्यामुळे त्यांना वादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर घेता आलेले नसल्यामुळे वादी क्र. ३ यांचेविरुध्द सदरचा दावा अबेट झालेला आहे. त्यामुळे वादी क्र. ३ यांचे वारसांनी सदर अर्जाद्वारे अबेटमेंटचा आदेश रद्द होणेची विनंती केली.

२. सदर अर्जास प्रतिवादीतर्फे म्हणणे देऊन सदरजा अर्जातील मजकूर खोटा, चुकीचा व लबाडीचा असून प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही. त्यामुळे अर्ज रद्द करणेविषयी विनंती केली आहे.

३. सदरच्या अर्जावर दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकला. सदरचा दावा चालू असताना वादी क्र. ३ तारामती रामचंद्र भंडारे ही दि. २६/०८/२०२० रोजी मयत झालेली आहे. कोरोना या आजारामुळे व त्यांना सदर दाव्याची माहिती नसल्यामुळे त्यांना मुदतीमध्ये वारस रेकॉर्डवर घेता आलेले नाहीत. त्यामुळे सदर वादी क्र. ३ चे विरुध्द दावा अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. सदर कथनाच्या पृष्टयर्थ वादी क्र. ३ चे वारसातर्फे निशाणी ६३ वर शपथपत्र दाखल केले आहे. प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द निरंतरची ताकीद मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. त्यासाठी वादी क्र. ३ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. तसेच कोरोना महामारीचा प्रादुर्भाव असल्याने वादी क्र. ३ चे वारसांना अबेटमेंट रद्द करुन घेण्यास झालेला विलंबासाठी खर्चाचा आदेश करणे योग्य होणार नाही. सबब, खालील आदेश करण्यात येते.

आदेश

१. अर्ज (नि.६२) मंजूर करण्यात येतो.

२. वादी क्र.३ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट रद्द करण्यात येतो.

SEEMA KETAN DESHMUKH
Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2022.07.16 11:20:31 +0530

सांगोला.
दिनांक – १५/०७/२०२२

( सौ. एस. के. देशमुख )
दिवाणी न्यायाधीश क. सतर,
सांगोला.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S. P. Parekar |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh, Civil Judge, J.D.& J.M.F.C., Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 15/07/2022 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 15/07/2022 |